क्रमांक :- पोमसं/३१/परिपत्रके-संकिर्ण /१८६ /२०२१, मुंबई, दि. २२/~~०९~~ 10/२०२१

# परिपत्रक

पोलीस विभागातील सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार हे संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार, सेवार्थ प्रणालीवर स्वत: पासवर्ड तयार करुन स्वत:ची जीपीएफ पावती ही ऑनलाईन पध्दतीने प्राप्त करुन घेऊ शकतात. प्रत्येक पोलीस अधिकारी/अंमलदार यांना स्वत:ची ऑनलाईन पध्दतीने जीपीएफ पावती काढण्यासाठी प्रोत्साहीत करावे, तसेच मार्गदर्शनही करावे.

पोलीस अधिकारी आणि अंमलदार हे "सेवार्थ" प्रणालीवर "महाकोष" या संकेतस्थळावर खालीलप्रमाणे जाऊन जीपीएफ पावती प्राप्त करु शकतात :-

प्रथम संबंधीत पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी Sevaarth - www.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर जाऊन User name मध्ये स्वत:चा सेवार्थ ID नमुद करावा. त्यानंतर User Password मध्ये (ifms१२३) हा पासवर्ड टाकावा. सदरचा पासवर्ड त्यांनी लगेच बदल करुन घेणे योग्य राहील. त्यानंतर Enter Captcha मध्ये दिलेले अक्षर टाईप करुन Submit या बटणवर क्लिक करावे त्यानंतर Home Page वर Left side - Employee corner मध्ये क्लिककेल्यानंतर view GPF slip क्लिक केल्यावर जीपीएफ पावती उपलब्ध होईल.

शासकिय अधिकारी/कर्मचारी हे जर पासवर्ड विसरले असतील तर संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांनी त्यांना पासवर्ड रिसेट करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारु नये, घटक प्रमुखांनी याकडे विशेष लक्ष द्यावे.

सर्व घटक प्रमुखांनी वरील बाब सर्व पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त, (रेल्वेसह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नागरीहक्कसंरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणेसंचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/विशेष कृती दल, नागपूर
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षणकेंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षणकेंद्रे/अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गटक्र. १ ते १६

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणककक्ष, मुंबई

२/- यांनी सदरचे परिपत्रक " पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या जीपीएफ पावतीसाठी पासवर्ड तयार करुन देण्याबाबत " (Right to Info. About Reset Sevaarth Password to Police Officers &men ) या हेडींगसह दोन महिन्याकरिताwww.mahapolice.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करावे.